रे.के.नं.९३/२०२३
नि.क्र. ३३/क च्या पुढे

<u>उलटतपास आरोपीतर्फे आरोपीचे वकील श्री. एस. पी. घरत यांच्याव्दारे...</u>

२. मी घटनास्थळाला भेट दिली होती. माझे तपासात घटनास्थळावर तिवरांची झाडे होती हे निष्पन्न झाले होते. कंपनीचे कामगार तेथिल तिवराची झाडे तोडून तेथे काम करत असल्याचे माझे तपासात निष्पन्न झाले नाही. हे म्हणणे खरे आहे की, घटनास्थळ हे फुंडे गावाच्या रहदारीच्या रस्त्यालगत असल्याचे माझे तपासात निष्पन्न झाले आहे. घटनेच्या वेळी गावातील अनेक लोक तेथे जमल्याचे माझे तपासात निष्पन्न झाले नाही. तेथे असलेल्या तिवारांच्या झाडाची कत्तल होत असल्याने गावातील सरपंच व गावकऱ्यांनी तहसिलदार व वनपरिक्षेत्र अधिकारी यांचेकडे तक्रार केल्याचे माझे तपासात निष्पन्न झाले नाही. त्याबाबतची बातमी पुण्यनगरी व इतर वृत्तपत्रात प्रसिद्ध झाल्याचे माझे तपासात निष्पन्न झाले नाही. हे म्हणणे खरे नाही की, गावातील लोक तेथील तिवराची झाडे कंपनीच्या कर्मचाऱ्यांनी तोडू नयेत असे गावकरी विनंती करत, हे निष्पन्न झाले होते. गावातील लोकांना रहदारी करीता त्रास होत असल्याचे व तशी तक्रार गावकरी करीत होते, हे माझे तपासात निष्पन्न झाले नाही.

प्रश्न : पंच साक्षीदार कंपनीचे कर्मचारी असल्याचे तुमच्या तपासात निष्पन्न झाले.

उत्तर : पंचनामा मी केलेला नाही.

हे म्हणणे खरे आहे की, मी मेहेर फाऊंडेशनच्या कर्मचाऱ्या व्यतिरिक्त इतर कोणाचेही तपास टिपण नोंदविलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी इतर कोणताही स्वतंत्र साक्षीदार तपासलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की,गावातील सरपंच व लोकांनी कंपनी विरुद्ध तहसिलदार व वनपरिक्षेत्र अधिकारी यांचेकडे तक्रार केल्याने कंपनीने खोटी फिर्याद दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे तपास

टिपण नोंदविले. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटा तपास करुन खोटे दोषारोपपत्र दाखल केले. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्विकृत

सही/-

(एस.पी.वानखडे)
न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग, उरण
(कोर्ट नं. २)

उरण,
दिनांक – ०९/०१/२०२६